(11)

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

जा.क्र.१०/एनजीपी/पदविका/अतिरीक्त फेरी/२०१८/१००६
दि. 20 AUG 2018

विषय: शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या शासकीय, अशासकीय अनुदानीत,विद्यापीठ विभागातील संस्थामध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांकरिता घेण्यात येणा-या अतिरिक्त प्रवेश फेरीमध्ये विनाअनुदानित संस्थांचा समावेश करणेबाबत...

संदर्भ:- मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे असोसिएशन ऑफ द मॅनेटमेंट ऑफ पॉलीटेक्नीक्स व इतर यांनी महाराष्ट्र शासन व इतर विरुध्द दाखल केलेली रिट याचिका क्रमांक क्र. ९०९०/२०१८ मध्ये दि. १६.०८.२०१८ रोजी दिलेले आदेश.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी अनुक्रमे दि. १९.०८.२०१८ रोजी पूर्ण झालेली आहे. दरम्यानच्या काळात अतिरिक्त फेरीमध्ये विनाअनुदानित प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थांचा समावेश करण्यासाठी असोसिएशन ऑफ द मॅनेटमेंट ऑफ पॉलीटेक्नीक्स व इतर यांनी रिट याचिका क्र. ९०९०/२०१८ मा. उच्च न्यायालय, मुंबई, येथे दाखल केली. उपरोक्त संदर्भाधिन रिट याचिकेमध्ये दि. १६.०८.२०१८ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अतिरिक्त फेरीसाठी आवश्यक प्रक्रिया खालील प्रमाणे असेल.

१. ज्या विनाअनुदानित प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थाना या प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घ्यावयाचा आहे, अशा प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थांनी संचालनालयाच्या प्रवेशा संबंधित http://poly18.dtemaharashtra.org या संकेतस्थळावर संस्थेच्या Login मधून अतिरिक्त फेरीमध्ये समाविष्ट करून घेण्यासाठी अभ्यासक्रमनिहाय स्वीकृती देणे आवश्यक आहे. त्यानंतर अशा संस्थांना त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल कोणत्याही सबबीखाली करता येणार नाही. तसेच विहित मुदतीत संस्थेने स्वीकृती न दिल्यास सदर संस्थेस अतिरिक्त फेरीतुन वगळण्यात येईल.
२. संस्थेने Online पध्दतीने अतिरिक्त फेरीमध्ये समाविष्ट होण्यासाठी स्वीकृती दिल्यानंतर त्या प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून (तिसऱ्या फेरीनंतर) शिल्लक राहिलेल्या रिक्त जागा आपोआप अतिरिक्त फेरीसाठी घेण्यात येतील.

अतिरिक्त फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी विनाअनुदानित संस्थांनी, खालील नमुद केल्यानुसार संस्थेच्या Login मधून स्वीकृती देणे व संस्थांनी संकेतस्थळावर माहिती अद्ययावत करणे -

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम (online mode) | २१.०८.२०१८ ते २२.०८.२०१८ (upto 5.00 pm) |

प्रवेशाच्या अतिरिक्त फेरीसंबंधी महत्वाच्या सूचना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर स्वतंत्र्य अधिसूचनेव्दारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत. तरी, संबंधित प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थांनी अधिसूचनेचे अवलोकन करावे.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत:- माहीती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, मुंबई, पुणे

२) प्राचार्य/संचालक प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या सर्व विनाअनुदानित संस्था

३) कार्यासन क्र. ३ मुख्य कार्यालय, मुंबई